# प्रेसनोट

दि. १८/०३/२०२३

सासवड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्यासाठी मध्यस्थी करणा-या दोन खाजगी इसमांवर लाच मागणी प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | सासवड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण गु.र.नं. १६०/२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम - ७ अ, १२. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ५० वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | १) अक्षय सुभाष मारणे, वय २९ वर्ष, (खाजगी इसम)<br>२) गणेश बबनराव जगताप, वय ४० वर्ष, (खाजगी इसम)<br>दोघे रा. सासवड, ता. पुरंदर, जि. पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३,००,०००/- (तीन लाख रूपये) |

पडताळणी दिनांक :- १३/१०/२०२२

गुन्हा दाखल दिनांक :- १८/०३/२०२३

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचे कॉलेज असून, कॉलेज संबंधाने काही माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी तक्रार केली असून, ते कार्यकर्ते ब्लॅकमेल करून खंडणी मागत असलेबाबतचा लेखी तक्रार अर्ज सासवड पोलीस स्टेशन येथे केला होता. त्या अर्जावरुन गुन्हा दाखल करण्याकरीता सासवड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक घोलप व घोलप यांचेवतीने गणेश जगताप, रा. सासवड यानी ३,००,०००/- रुपये लाच मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता, तक्रारदार याना त्यांचे अर्जावरुन सासवड पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याकरीता सासवड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक घोलप यांचेकरीता क्र. १ अक्षय सुभाष मारणे यानी तीन लाख रुपये लाचेची मागणी केली व त्या लाच मागणीस क्र. २ गणेश बबनराव जगताप यानी सहाय्य केले म्हणून दोघांविरुद्ध वरील प्रमाणे लाच मागणीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यामध्ये दोघांना अटक करण्यात आली आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक संदिप व-हाडे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१) <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
२) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३) व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे – ७८७५३३३३३३
४) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई – ९९३०९९७७००
५) ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६) वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७) ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/ पोलीस उप अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे युनिट.